महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,जळगांव

Jilhapeth, Govt. Hospital Campus, Jalgaon - 425001, M.S. (INDIA)
**Telephone & Fax No. 0257- 2222917** **Email- deangmcjalgaon@gmail.com**

जा.क्र.शावैमज/भांडार-अ/२०२५-२६/ किट्स काचसामान व रसायने/खरेदी/दरपत्रक/४१८४ /२०२५, दिनांक२९ /०७/२०२५

**दरपत्रक मागणी पत्र**

प्रति,

-------------------------------

-------------------------------

**विषय :- दरपत्रक मोहोरबंद लिफाफे सादर करणेबाबत..**

**संदर्भ :** १. कार्यालयीन मागणी पत्र क्र.शावैमज/भांडार-अ/२०२५-२६/किट्स व केमिकल्स /३२१२/२०२५, दि.१८.०६.२०२५
२. विविध विभागामार्फत कार्यालयास प्राप्त मागणीपत्र
३. दि.२२.०७.२०२५ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्तांत

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन सविनय सादर करण्यात येते की, संदर्भ क्र.१ अन्वये सन २०२५-२६ या वित्तीय वर्षातील अनुदानातुन शैक्षणिक व रुग्णोपचारासाठी लागणारे किटस, काचसामान व रसायने खरेदी करणेबाबत मागणीपत्र मागविण्यात आलेले होते.

त्या मागणीपत्रास अनुसरुन संदर्भ क्र.२ अन्वये विविध विभागाकडून मागणीपत्र प्राप्त झालेले आहेत. प्राप्त मागणीपत्रानुसार संदर्भ क्र.३ अन्वये दि.२२.०७.२०२५ रोजी मा.अधिष्ठाता यांच्या अध्यक्षतेखाली अधिष्ठाता दालनात बैठक घेण्यात आली व बैठकीच्या इतिवृत्तांतानुसार सद्यस्थितीत अत्यावश्यक असणारे खालील किट्स, काचसामान व रसायने यांची खरेदी स्थानिक स्तरावर दरपत्रक मागवून करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. तदनंतर किट्स, काचसामान व रसायने खरेदी करण्यासाठी दरपत्रक मागविण्याबाबत कार्यालयीन टिपणी मंजुर करण्यात आलेली आहे.

करिता खालील अटी व शर्तीनुसार पुरवठादाराकडुन मोहोरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत. तरी इच्छुक पुरवठाधारकांनी त्यांचे दरपत्रके मोहोरबंद लिफाफे विहीत मुदतीत या कार्यालयाच्या आवक शाखेत खालील अटी व शर्तीनुसार सादर करावे.

| अ.क्र. | महत्वाच्या अटी व शर्ती |
|---|---|
| १ | दरपत्रक मोहोरबंद लिफाफा दि.७ /०८/२०२५ रोजी सायं. ५:३० वाजेपर्यंत कार्यालयास प्राप्त होतील या बेताने पाठवावे. जाहीर केलेल्या तारखेनंतर अथवा कार्यालयीन वेळेनंतर आलेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही/ग्राह्य धरले जाणार नाही. |
| २ | सुचना फलक/ संस्थेच्या www.gmcjalgaon.orgया संकेतस्थळावर जाहीर नोटिसप्रमाणे इच्छुक पुरवठाधारकांनी / इच्छुक कंपनीने देखील दरपत्रक मोहोरबंद लिफाफा सादर करण्याची मुभा देण्यात येत आहे. |
| ३ | दरपत्रक मोहोरबंद लिफाफा **अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव** यांचे नावे विहीत मुदतीत कार्यालयास सादर करावा. त्याचप्रमाणे दरपत्रक मोहोरबंद लिफाफ्यावर शैक्षणिक व रुग्णोपचारासाठी लागणारे किट्स, काचसामान व रसायने पुरवठा करीता दरपत्रक, तसेच डाव्या बाजुस **दरपत्रक** लिफाफा जमा करण्याचा अंतिम दिनांक, दरपत्रक धारकाच्या नावाचा शिक्का, इ. बाबी नमुद असणे आवश्यक आहे. |
| ४ | दरपत्रक मोहोरबंद लिफाफे ही दि.८ /०८/२०२५ रोजी सकाळी ०३.३० वा. मा.अधिष्ठाता यांच्या दालनात खरेदी समिती समोर उघडण्यात येतील. आपणास जर दरपत्रक मोहोरबंद लिफाफे उघडण्याच्या प्रक्रीयेत सहभाग घ्यावयाचा असल्यास नियोजित वेळेत स्वखर्चाने उपस्थित रहावे. |
| ५ | दरपत्रक ग्राह्य कालावधी हा पुरवठा आदेश नोंदविलेल्या दिनांकापासुन सहा (६) महिन्यांचा राहील. |
| ६ | प्रस्तावित किट्स, काचसामान व रसायने दरपत्रकात आकारण्यात आलेले दर हे बाजारभावापेक्षा अधिक नसावेत. सर्वात कमीत कमी दराचे पत्रक व वस्तुचा दर्जा/ गुणवत्ता उत्कृष्ट असेल, अशाच दरपत्रकांचा विचार करण्यात येईल. |
| ७ | किट्स, काचसामान व रसायने जीएसटी कर व एकुण किंमत असे स्वतंत्रपणे दर्शविण्यात यावे. दरपत्रकात खाडाखोड करण्यात येवू नये. |
| ८ | मागणी करण्यात आलेली किट्स, काचसामान व रसायने ही विनिर्दिष्ठानुसार व उत्कृष्ठ दर्जाची व गुणवत्तेची व लॉंग |

| | |
|---|---|
| | एक्सपाईरी असणे अत्यंत आवश्यक आहे. |
| ९ | दरपत्रक सिलबंद लिफाफ्यात सादर करावयाचे दस्ताऐवज (Document) :-<br>१) अधिकृत लेटरहेड वर दरपत्रक सादर करावे.<br>२) दुकानाचा परवाना,<br>३) जी.एस.टी. नोदंणी प्रमाणपत्र,<br>४) पॅनकार्डची प्रत,<br>५) अनुभव प्रमाणपत्र,<br>६) पुरवठादार हा अधिकृत विक्रेता असल्याचे संबंधित कंपनीचे अधिष्ठाता यांचे नावे असलेले प्रमाणपत्र ( सोबत नमुन्याची प्रत संलग्न),<br>७) प्रत्येक पुरवठाधारकास केवळ एक दरपत्रक सादर करता येईल. खरेदी प्राधिका-यासोबत हितसंबंधचा संघर्ष नसल्याबाबत तसेच एकल दरपत्रक देण्याबाबत हमीपत्र (Undertaking) व सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रमाणपत्र (सोबत प्रत संलग्न), उक्त सर्व दस्तऐवज वैध (Valid) तसेच विहीत नमुन्यात असणे बंधनकारक असुन, सर्व दस्ताऐवज सिलबंद लिफाफयामध्ये सादर करणे आवश्यक आहे. सर्व दस्ताऐवज (Document Checklist) क्रमाने दरपत्रकासोबत संलग्नीत करावे. |
| १० | वरील अट क्रमांक ९ मध्ये नमुद दस्ताऐवज ही लहान किट्स, काचसामान व रसायने यांना आवश्यकतेनुसार शिथील करण्याचे अधिकार अधिष्ठाता यांना राहतील. |
| ११ | किट्स, काचसामान व रसायने पुरवठा (Delivery):- पुरवठा आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासुन (१५) दिवसांत किटस/टेस्ट चा पुरवठा करण्यात यावा. विहीत मुदतीत पुरवठा करुन किट्स, काचसामान व रसायने प्रस्थापित व कार्यान्वित न केल्यास होणा-या विलंबास नियमानुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल. |
| १२ | देयकाची अदायगी (Payment):- पुरवठा करण्यात आलेले किट्स, काचसामान व रसायने समाधानकारकरित्या प्रस्थापित व कार्यान्वित करुन दिल्यानंतर, विनिर्दिष्ठानुसार व उत्कृष्ठ दर्जाचे/ गुणवत्तेची असल्याबाबत संबंधित विभाग तथा संस्थेतील तांत्रिक समिती यांचेकडुन स्वंतत्र अहवाल कार्यालयास प्राप्त झाल्यानंतरच तसेच पुरवठा आदेशातील सर्व अटी व शर्तीनुसार संपुर्ण दस्तऐवजांची पुर्तता केल्यानंतरच रक्कम अदा करण्यात येईल. |
| १३ | किट्स, काचसामान व रसायने पुरवठा आदेश दिल्यानंतर दरपत्रक तसेच पुरवठा आदेशातील अटी व शर्तीनुसार यंत्राचा पुरवठा विहीत मुदतीत करणे बंधनकारक राहील. विहीत मुदतीत पुरवठा न केल्याचा द्वितीय न्युनतम दरपत्रकधारकास पुरवठा आदेश देण्यात येतील. |
| १४ | अपवादात्मक परिस्थितीमुळे उक्त कोणत्याही आवश्यकतेनुसार अंशत: बदल करणे, अथवा प्राप्त झालेली दरपत्रके कोणतेही कारण न देता स्विकारणे/नाकारणे तसेच कोणत्याही स्तरावर खरेदीप्रक्रीया रद्य करणे इ. अधिकार संस्थाप्रमुख (अधिष्ठाता) यांनी राखुन ठवलेले आहेत. |

(डॉ. गिरीष ठाकुर,)
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
जळगाव.

प्रत :- सुचना फलक/ संकेतस्थळ जाहीर नोटिस, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव.
प्रत :- संकेतस्थळ जाहीर नोटिस, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव

महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,जळगांव

Jilhapeth, Govt. Hospital Campus, Jalgaon - 425001, M.S. (INDIA)

**Telephone & Fax No. 0257- 2222917** **Email- deangmcjalgaon@gmail.com**

दिंनाक२१/७/२०२५

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव

### दरपत्रक नोटिस

सन २०२५-२६ या वित्तीय वर्षातील अनुदानातुन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,जळगांव या संस्थेतील शैक्षणिक व रुग्णोपचारासाठी लागणारे किट्स, काचसामान व रसायने खरेदी करावयाची आहे. करिता इच्छुक पुरवठादानांनी सोबत जोडलेल्या यादीनुसार दरपत्रके सादर करावयाची असतील तर अशा पुरवठादारांनी पुरवठा करावयाच्या किट्स, काचसामान व रसायने विनिर्दिष्ठे यांची मुळ प्रत दिनांक३० /०७/२०२५ ते दि.७ /०८/२०२५ पावेतो कार्यालयीन वेळेत सकाळी १०.०० ते सायंकाळी ०५.३० वाजेपर्यंत प्राप्त करावी. सदरील दरपत्रके दरपत्रकातील अटी व शर्तीनुसार मोहरबंद लिफाफ्यामध्ये दिनांक-७ /०८/२०२५ रोजी पावेता सायंकाळी ०५.३० वाजेपर्यंत जमा/सादर करावीत.

| कार्यालयाचा पत्ता |
|---|
| अधिष्ठाता,<br>शासकीय वैद्यकीय महावद्यालय ,जळगाव<br>जिल्हा सामान्य रुग्णालय आवार, जिल्हा पेठ,<br>जळगाव-४२५००१ |

(डॉ. गिरीष ठाकुर)
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
जळगाव.

**प्रत** :- सुचना फलक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव.

**प्रत** :- संकेतस्थळ जाहीर नोटिस, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव.

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव

| अ. क्र | साहित्य/किटस/रिएजन्ट नावे | वजन | नग | विभागाचे नाव |
|---|---|---|---|---|
| 1 | Formalin | 5ltr jar | 01 | शरीररचनाशास्त्र |
| 2 | Glycerol | 2.5LTR | 01 | |
| 3 | Spirit | 400ml | 01 | |
| 4 | Thymol | 250 Mg | 01 | |
| 5 | Antisera A | 10 ml | 01 | शरीरक्रियाशास्त्र |
| 6 | Antisera B | 10 ml | 01 | |
| 7 | Antisera D | 10 ml | 01 | |
| 8 | WBC Diluting Fluid | 500 ml | 01 | |
| 9 | Distilled Water | 05 Ltr | 01 | |
| 10 | RBC Diluting Fluid | 500 ml | 01 | |
| 11 | Leishman Stain | 250ml | 01 | |
| 12 | Oil for Microscope | 125ml | 01 | शरीरविकृतीशास्त्र |
| 13 | Benedict Reagent (Qualitative) | 5000ML | 01 | |
| 14 | Formaldehyde Solution 37 % | | 01 | |
| 15 | Ammonia Solution 30% EXTRA PURE | 500 ml | 01 | |
| 16 | ABO Blood Group Antisera | | 01 | |
| 17 | Egg Albumin | 500gm | 01 | |
| 18 | HIV Elisa Kits (96 tests) | | 01 | Blood Bank<br>शरीरविकृतीशास्त्र |
| 19 | HCV Elisa Kits (96 tests) | | 01 | |
| 20 | Anti A1 | 5ml | 01 | |
| 21 | AHG COOMBS GEL CARD DILUENT-2 LISS 250 ML BOOTLE 1 X 24 CARDS | 250ML | 01 | |
| 22 | VDRL (RPR) Spot test | 1X50 | 01 | |
| 23 | CuSO4 Powder (Anhydrous Crystals | 500gm | 01 | |
| 24 | Tip Box 1000 ul Holder | 1000 ul | 01 | |
| 25 | Tip Box 200 ul Holder | 200 ul | 01 | |
| 26 | Tip Box 100 ul Holder | 100 ul | 01 | |
| 27 | Antisera Holder Stand Big Size | | 01 | |
| 28 | Blue Tips 100 – 1000 ul | 1000 ul | 01 | |
| 29 | Tube Stand (Metal) Stainless Steel Material 48 Tubes | | 01 | |
| 30 | Pointed Forceps (Stainless Steel) | | 01 | |
| 31 | Scissor (Stainless Steel) | | 01 | |
| 32 | Stripper Blood Bag | | 01 | |
| 33 | Micropipette 100-1000 ul Adjustable | 1000 ul | 01 | |
| 34 | Micropipette 50-200 ul Adjustable | 50-200 ul | 01 | |
| 35 | Micropipette 05-50 ul Adjustable | 05-50 ul | 01 | |
| 36 | Plastic Tube Plain | | 01 | |
| 37 | Pipette Stand | | 01 | |
| 38 | Round Adhesive Band Aid | | 01 | |
| 39 | Antisera A,B,D | | 01 | |
| 40 | ERBA H360 LYSE | 500ML | 01 | |

(डॉ. गिरीष ठाकुर)
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
जळगाव.

**एकल दरपत्रक अधिकृत विक्रेता/पुरवठादार/कंपनी यांचे लेटरहेड**

Letter No.                    Date :-

प्रति
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
जळगांव

विषय :- एकल दरपत्रक सादर करणेसंबंधीचे हमीपत्र सादर करणेबाबत...

संदर्भ :- आपले दरपत्रक मागणी पत्र
क्रमांक. ____________________
दिनांक ____________________

महोदय

संदर्भांकित दरपत्रक मागणी पत्रानुसार मागणी करण्यात आलेले एकल दरपत्रक सादर करण्यासंबंधीचे हमीपत्र मी खालील प्रमाणे सादर करीत आहे.

## <u>हमीपत्र (Undertaking)</u>

याद्वारे हमी देतो की, दरपत्रक प्रक्रियेसाठी एकच दरपत्रक सादर करीत आहे. आमच्याच फर्मशी निगडीत असलेल्या कुठल्याही व्यक्तीच्या नावे किंवा अप्रत्यक्षपणे केवळ आम्हास लाभ होईल, अश्याप्रकारे दुसरे दरपत्रक दरपत्रकप्रक्रियेमध्ये सादर केलेला नाही. तसेच माझा/आमचा आपल्या कार्यालयातील खरेदी प्राधिकाऱ्यांशी कुठलेही हितसंबंध नाही.

उक्त बाब भविष्यात असत्य/खोटी आढळुन आल्यास, सर्वस्वी जबाबदारी आमची राहील. नियमानुसार होणाऱ्या कार्यवाहीस मी/आम्ही पात्र असू. तद्संबंधी माझी/आमची कुठलीही हरकत राहणार नाही. अशी याद्वारे हमी देत आहे.

अधिकृत व्यक्तिचे नाव व स्वाक्षरी, शिक्का
अणि मोहर
Authorized Person Name,
Signature
with Stamp and Seal

## मागणी पत्रातील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत हमीपत्र

## दरपत्रकधारक अधिकृत विक्रेता/पुरवठादार/कंपनी यांचे लेटरहेड

Letter No. Date :-

प्रति
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
जळगांव.

विषय :-दरपत्रक मागणी पत्रातील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत हमीपत्र सादर करणेबाबत...

संदर्भ :- आपले दरपत्रक मागणी पत्र
क्रमांक. ____________________
दिनांक ____________

महोदय

संदर्भांकिंतदरपत्रक मागणी पत्रातील सर्व अटी व शर्ती मी वाचून दरपत्रक दरपत्रकप्रक्रियेसाठी सादर करीत आहे. सर्व अटी व शर्ती मान्य असूनतद्संबंधीचे हमीपत्र खालीलप्रमाणे सादर करीत आहे.

## <u>हमीपत्र (Undertaking)</u>

याद्वारे हमी देतो की, दरपत्रक मागणी पत्रात नमुद असलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असुन, त्यांचे तंतोतंत पालन करण्यात येईल. तसेच दरपत्रक सिलबंद लिफाफ्यात सादर करण्यात आलेली संपुर्ण माहिती, दस्ताऐवज, व करारनामे इ.भविष्यात असत्य/बनावट/अवैध आढळुन आल्यास, सर्वस्वी जबाबदारी आमची राहील. नियमानुसार होणाऱ्या कार्यवाहीस मी/आम्ही पात्र असू. तद्संबंधी माझी/आमची कुठलीही हरकत राहणार नाही. अशी याद्वारे हमी देत आहे.

अधिकृत व्यक्तिचे नाव व स्वाक्षरी,
शिक्का अणि मोहरAuthorized Person
Name, Signature
with Stamp and Seal